तंत्रज्ञान अधिविभाग.
दि. १८.०१.२०२४

# सर्व प्रवर्गामधील (OPEN,EWS,MINORITY,SEBC, SC, ST, SBC, OBC,VJNT) स्कॉलरशीप व फ्रीशीपबाबत महत्वाची सुचना शैक्षणिक वर्ष २०२३–२४

तंत्रज्ञान अधिविभागातील बी. टेक. भाग प्रथम, द्वितीय, थेट द्वितीय, तृतीय व चतृर्थ वर्ष तसेच एम्. टेक. भाग १ व २ (SC/ST Category) करिता सन २०२३–२४ सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, वरील सर्व प्रवर्गामधील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह योजना, अल्पसंख्याक (महाराष्ट्र राज्य) भारत सरकार शिष्यवृत्ती व फ्रिशीपचे ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता www.mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळाचा वापर करण्यात यावा.

१. सदर शिष्यवृत्तीचा नवीन अर्ज भरण्याकरिता विद्यार्थ्यांचे नवीन Login ID & Password तयार करणे आवश्यक आहे. तसेच यापुर्वी विदयालयीन/महाविदयालयीन जुना Login ID & Password उपलब्ध असल्यास नवीन तयार करण्याची अवश्यकता नाही.

**२. प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष विदयार्थ्यांच्याकरिता New Application व द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष, चतूर्थ वर्ष विदयार्थ्यांनी अर्ज Renewal Application करावयाचे आहे.**

३. त्यासाठी विद्यार्थ्यांचे स्व:ताचे राष्ट्रीयकृत बॅकेतील बचत खाते आधार कार्डशी (NPCI) संलग्न असले पाहीजे.

४. सदर शिष्यवृत्ती व सवलतीचा अर्ज भरण्यामध्ये काही अडथळे व अडचणी असल्यास तात्काळ कार्यालयामध्ये संपर्क साधावा.

५. सर्व विदयार्थ्यांनी College Name : Department of Technology, Shivaji University Kolhapur. Select करावे.

६. Current Course Details मध्ये **Course Type – UnAided** Select करावे.

SHIVAJI UNIV
Department of Technology, Kolhapur.

७. **विदयार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना सर्व कागदपत्रे मुळ (Original) अथवा सत्यप्रती Upload करावयाचे आहेत. कोणत्याही कागदपत्राची झेरॉक्स् प्रत Upload करू नये.**

८. **SC, ST, SBC, OBC,VJNT** या प्रवर्गामधील सर्व विदयार्थ्यांनी अर्जामध्ये महाविदयालयाची शैक्षणिक शुल्क ०० नोंदवण्यात यावी. तसेच फी पावतीच्या ठिकाणी विदयार्थ्यांने बोनाफाईड प्रमाणपत्र (Bonafide Certificate) Upload करावे.

९. **OPEN** प्रवर्गामधील सर्व विदयार्थ्यांनी **भरणा केलेली रक्कम अथवा ३७५०० शैक्षणिक शुल्क** (Tuition Fee) नोंदवण्यात यावी. तसेच फी पावती Upload करावी.

१०. अर्जदाराने आवश्यक कागदपत्रे व अर्जामधील माहिती बिनचुक भरणे आवश्यक आहे. तसेच विदयार्थ्यांने ज्या प्रवर्गातून (SC, ST,SBC, NT-1/2/3, VJ-NT, OBC,OPEN, EWS) प्रवेश निश्चीत केला आहे त्याचा स्कॉलरशीप अथवा फ्रिशीपचा (उत्पन्न मर्यादेनुसार) अर्ज भरावयाचा आहे. याबाबत **प्रत्येक विद्यार्थ्यास स्वंतत्र कळविण्यात येणार नाही.**

**११.** जे विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्ती व फ्रिशीपचे तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना अर्ज ऑनलाईन भरणार नाहीत अशा विद्यार्थ्याच्या कडून त्या वर्षाचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क भरुन घेतले जाईल त्यास अधिविभाग जबाबदार राहणार नाही यांची गांभीर्याने नोंद घ्यावी.

१२. जे विद्यार्थी वसतीगृह अथवा भाडे करार तत्वावर राहत आहेत अशा विदयार्थ्यानी अर्जामध्ये Hosteller नमुद करावे.

१३. सर्व खुल्या प्रवर्गामधील प्रवेशीत विदयार्थ्यांना कळविण्यात येते की, ज्या विदयार्थ्यांना पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेसाठी अर्ज भरावयाचे आहेत त्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेच्या अर्जामध्ये Hosteller नमुद करणे आवश्यक आहे.

१४. **SC, SBC, OBC,VJNT** प्रवर्गामधील प्रवेशीत विदयार्थ्यांना उत्पन्न मर्यादेबाबत महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक : इबीसी २०१४/प्र. क्रं ४०/शिक्षण–१ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०००३२ दिनांक ०८ जुलै, २०१४ अन्वये कळविण्यात येते की, व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या व पालकाचे वार्षिक उत्पन्न मर्यादेत असलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गामधील विद्यार्थ्यास शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती योजनेचा लाभ दिल्यानंतर ही सवलत अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील. **अशा विद्यार्थ्यांना दरवर्षी उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.**

१५. विदयार्थ्यांने अर्ज भरताना Profile Type – Non Aadhaar Select करून अर्ज भरू नये.

१६. प्रत्येक विदयार्थ्यांने आपल्या लॉगीनमध्ये अर्ज पात्र अथवा त्रुटीची पुर्तता करणेकरिता परत

पाठविण्यात आलेला आहे याची खात्री करणे आवश्यक आहे.

SHIVAJI UNIVERSITY Department of Technology, Kolhapur.

१७. प्रतिज्ञापत्र, हमीपत्र, उपस्थिती प्रमाणपत्र, वसतीगृहात राहत असल्याबाबतचे प्रमाणपत्र झेरॉक्स् सेंटरमध्ये उपलब्ध आहे. तसेच अधिविभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना अर्ज २०२३–२४ (ऑनलाईन भरलेला)
२. उत्पन्नाचा दाखला आर्थिक वर्ष २०२२–२३ (उत्पन्न मर्यादा ८ लाख)
३. रेशनकार्ड
४. शाळा सोडलेल्याच्या दाखला (सत्यप्रत) प्रथम व थेट द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्याकरिता.
५. अधिवास प्रमाणपत्र (सत्यप्रत) (Domicile Certificate)
६. मार्कलिस्ट ( १० + १२ ) (१० + डिप्लोमा)
७. मार्कलिस्ट गत वार्षिक (क्रेडीट सिस्टीम)
८. कॅप कन्फंरमेशन पत्र
९. फी पावती
१० गॅप प्रमाणपत्र (असेल तर)
११ बॅक खातेकंमाक पासबुकची झेरॉक्स (कोणतेही राष्ट्रीयकृत बॅक).
१२ आधार कार्ड झेरॉक्स
१३ प्रतिज्ञापत्र
१४ उपस्थिती प्रमाणपत्र
१५ वसतीगृहामध्ये राहत असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र

## डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे

१. पंजाबराव देशमुख वसतीगृह निवार्ह भत्ता योजना अर्ज (ऑनलाईन भरलेला) २०२३–२४.
२. शेतमजूर दाखला/अल्पभुधारक प्रमाणपत्र (सत्यप्रत)
३. मुळ उत्पन्नाचा दाखला आर्थिक वर्ष २०२२–२३(उत्पन्न मर्यादा ८ लाख)
४. रेशनकार्ड व पालकांचे प्रतिज्ञापत्र
५. कॅप कन्फंरमेशन पत्र (सत्यप्रत)
६. फी पावती (सत्यप्रत)
७. मार्कलिस्ट ( १० + १२ ) (१० + डिप्लोमा). (सत्यप्रत)
८. मार्कलिस्ट गत वार्षिक (क्रेडीट सिस्टीम)(सत्यप्रत)

## SC, ST, SBC, OBC,VJNT-1/2/3 अर्जासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे.

१. स्कॉलरशीप/फ्रिशीप अर्ज (ऑनलाईन भरलेला) २०२३–२४.
२. उत्पन्नाचा दाखला वडिलांच्या नावे
३. रेशनकार्ड
४. जातीचा दाखला
५. जात वैधता प्रमाणपत्र
६. शाळा सोडलेल्याच्या दाखला
७. अधिवास प्रमाणपत्र
८. (१० वी + १२ वी) (१० वी + डिप्लोमा) मार्कलिस्ट
९. मार्कलिस्ट (क्रेडीट सिस्टीम) वार्षिक
१०. कॅप कन्फरमेशन पत्र
११. गॅप प्रमाणपत्र (असेल तर)
१२. बॅक खातेक्रमाक पासबुकची झेरॉक्स (कोणतेही राष्ट्रीयकृत बॅक).
१३. वसतिगृहात राहत असल्यास प्रमाणपत्र.
१४. हमीपत्र
१५. प्रतिज्ञापत्र
१६. उपस्थिती प्रमाणपत्र
१७. आधारकार्ड बॅक लिंक केलेबाबत पावती.

## अल्पसंख्याक शिष्यवृत्ती (महाराष्ट्र राज्य) सवलतीसाठी आवश्यक कागदपत्रे

१. अल्पसंख्याक शिष्यवृत्ती (महाराष्ट्र राज्य) सवलतीचा ऑनलाईन अर्ज.
२. मुळ उत्पन्नाचा दाखला आर्थिक वर्ष २०२२–२३ (उत्पन्न मर्यादा ८ लाख)
३. मार्कलिस्ट ( १० + १२ ) (१० + डिप्लोमा).
४. मार्कलिस्ट गत वार्षिक (क्रेडीट सिस्टीम)
५. कॅप कन्फरमेशन पत्र
६. फी पावती
७. गॅप प्रमाणपत्र (असेल तर)
८. बॅक खातेक्रमाक पासबुकची झेरॉक्स (कोणतेही राष्ट्रीयकृत बॅक)
९. शाळा सोडलेल्याच्या दाखला
१०.अल्पसंख्याक असल्याबाबतचे विदयार्थ्यांचे प्रमाणपत्र.

वरील दिलेल्या सुचनेनुसार सर्व कागदपत्रांची पुर्तता करून दिनांक ३१.०१.२०२४ रोजीपर्यत अर्ज ऑनलाईन भरण्यात यावेत. सदरच्या अर्जाची व आवश्यक कागदपत्राची प्रत संबंधीत शाखेच्या प्रयोगशाळा सहाय्यक यांच्याकडे जमा करावीत.

पात्र असलेल्या शिष्यवृत्ती व स्कॉलरशीपच्या विदयार्थ्यांना कळविण्यात येते की, अर्ज भरण्याची अंतिम मुदतीची प्रतिक्षा करू नये. तंत्रज्ञान अधिविभागामधील गतवर्षी भरलेल्या विदयार्थ्यांच्या संख्येच्या तुलनेत अतिशय अल्प प्रमाणात विदयार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत.

उत्पन्न मर्यादा :–

१) बी. टेक. एस्. सी. व एस्. टी. प्रवर्गामधील विद्यार्थ्यांच्याकरिता उत्पन्न मर्यादा रुपये २.५० लाख पर्यंत शिष्यवृत्ती व त्यापुढे फ्रिशीप.
२) एम्. टेक. एस्. सी व एस्. टी. प्रवर्गामधील विद्यार्थ्यांच्याकरिता उत्पन्न मर्यादा रुपये २.५० लाख पर्यंत शिष्यवृत्ती. एम्. टेक. करिता फ्रीशीप सवलत नाही.
३) बी. टेक. एन्. टी. ओबीसी, एस्बीसी, रुपये १.५० लाख पर्यंत शिष्यवृत्ती व रुपये ८ लाखापर्यंत फ्रिशीप.
४) बी. टेक. खुल्या प्रवर्गाकरिता ८ लाखपर्यंत उत्पन्न मर्यादा.

संचालक
Director
*Department of Technology*
**Shivaji University, Kolhapur**